क्र.2251/1477/2012-भाग-3/अठरा

# घोषणा

**विषय :- राज्यसेवा मुख्य परीक्षा — मराठी व इंग्रजी विषयांच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुपातील प्रस्तावित बदल**

सध्या राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या सहा पेपर्सपैकी सामान्य अध्ययन विषयाचे चार पेपर्स हे वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाचे आहेत. तर मराठी व इंग्रजी हे दोन पेपर्स परंपरागत म्हणजेच वर्णनात्मक स्वरुपाचे आहेत. मराठी व इंग्रजी पेपर्सच्या मूल्यांकनात अधिक पारदर्शकता व अचूकता आणण्यासाठी या दोन पेपर्सचे स्वरुप वर्णनात्मक ऐवजी बहुपर्यायी वस्तुनिष्ठ करण्याचा इरादा घोषित करुन त्याबाबत आयोगाने 20 जून 2015 च्या घोषणेद्वारे सुचना मागविल्या होत्या. याबाबतची कारणमीमांसा खालीलप्रमाणे आहे.

**कारणमीमांसा** :- राज्यसेवा मुख्य परीक्षेतील इंग्रजी व मराठी भाषा विषयाच्या पेपर्सचे स्वरुप बदलण्याचा आयोगाचा मुख्य हेतू हा निकालासाठीचा कालावधी कमी करणे नसून मूल्यांकनातील पारदर्शकता व अचूकता वाढविणे हा आहे. पेपर तपासणीचे काम लवकर करुन निकाल लवकर लावणे हा अनुषंगिक हेतू आहे. पारंपरिक पद्धतीच्या (वर्णनात्मक) परीक्षेत उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनात, कितीही प्रयत्न केले तरी, बरीच तफावत राहते. उत्तरपत्रिकांची फेर तपासणी (Moderation) करुनही मूल्यांकनातील तफावत पूर्ण नष्ट होत नाही. या संबंधात परीक्षकांना/फेर तपासणी करणा-या मॉडरेटर्सना आवश्यक सूचना देऊनही मूल्यांकनात एकसमान दर्जा रहात नाही. त्यामुळे समान दर्जाच्या उत्तरांनाही मिळणा-या गुणात बरेचदा फरक पडतो. व्यक्तीपरत्वे मूल्यांकनात फरक पडतो. स्पर्धा परीक्षेत एक एक गुण सुध्दा महत्वाचा व उमेदवाराचे भवितव्य घडविणारा असतो. त्यामुळे मूल्यांकनात आणखी पारदर्शकता व अचूकता असणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत आहे. उमेदवारांचे भाषेवरील प्रभुत्व व स्वत:चे विचार नेमक्या शब्दात मांडण्याची हातोटी समजून घेण्यासाठी वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या परीक्षेत मर्यादा येतात याची जाणीव असूनही, अत्यंत तीव्र स्पर्धा असलेल्या या परीक्षेत, उमेदवारावर एखाद्या गुणाचाही अन्याय/भेदभाव होवू नये हा आयोगाचा प्रयत्न आहे. सध्यस्थितीत, मराठी व इंग्रजी या दोन विषयाच्या 200 गुणांच्या वर्णनात्मक परीक्षेत व्यक्ती सापेक्ष मूल्यांकनामुळे काही गुणांची तफावत, रहातेच. यासाठी आयोग यात सुधारणा करु इच्छितो.

दिनांक 20 जून, 2015 च्या घोषणे नंतर प्राप्त झालेल्या सूचनांवर विचार करुन याबाबत आणखी काही विकल्प/पर्याय तयार केले असून ते आयोगाच्या विचाराधीन आहेत. या अधिकच्या पर्यायांवरही सूचना मागविण्यात येत आहेत. विचाराधीन पर्याय खालीलप्रमाणे आहेत.

**पर्याय अ** :- **बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुप**

आयोगाने दिनांक 20 जून, 2015 रोजीच्या घोषणेद्वारे प्रसिद्ध केलेला प्रस्ताव, जो खालीलप्रमाणे आहे.

"राज्यसेवा (मुख्य) परीक्षेच्या विद्यमान अभ्यासक्रमातील पारंपरिक स्वरूपाच्या मराठी व इंग्रजी या विषयाच्या प्रश्नपत्रिकांचे स्वरूप बदलण्याचे प्रस्तावित करावे. या परीक्षेतील इंग्रजी व मराठी विषयांच्या प्रश्नपत्रिकाही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या करण्यात याव्यात. इंग्रजी व मराठी विषयाच्या दोन स्वतंत्र प्रश्नपत्रिका राहतील. दोन्ही पेपरला प्रत्येकी 50 प्रश्न व 100 गुण असतील. हे दोन्ही पेपर आवश्यक किमान अर्हता (Qualifying) स्वरूपाचे असतील. पेपर मध्ये उत्तीर्ण होण्याकरीता किमान 40% गुण मिळविणे अनिवार्य राहील. दोन्ही पेपर मध्ये स्वतंत्रपणे उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**पर्याय ब :-** **पारंपरिक पण केवळ अर्हताकारी स्वरुप**

**मराठी व इंग्रजी दोन्ही पेपर्सचे/प्रश्नपत्रिकांचे स्वरुप सध्याप्रमाणेच ठेवणे. मात्र या दोन्ही पेपर्सचे गुण अंतिम गुणवत्तायादीसाठी ग्राह्य न धरता केवळ** qualifying **स्वरुपाची अट ठेवणे. म्हणजेच मराठी व इंग्रजी दोन्ही पेपर्समध्ये स्वतंत्रपणे** 35 **टक्के (किंवा** 40 **पर्सेंटाईल) एवढे गुण मिळणे अनिवार्य करणे.**

**पर्याय क :-** **मिश्र स्वरुप**

**मराठी व इंग्रजी दोन्ही पेपर्समधील अर्धा भाग वर्णनात्मक/परंपरागत ठेवणे. त्यातील गुण फक्त किमान उत्तीर्णतेसाठी** (qualifying) **विचारात घेणे. म्हणजेच अंतिम गुणवत्ता यादीसाठी वर्णनात्मक पेपर्सचे गुण विचारात न घेणे. उत्तीर्ण होण्यासाठी** 40 **पर्सेंटाईल गुण अनिवार्य करणे. तसेच मराठी व इंग्रजी दोन्ही पेपर्सचा अर्धा भाग वस्तुनिष्ठ बहुपर्यायी करणे व त्यातील गुण मात्र गुणवत्ता यादीसाठी ग्राह्य धरणे (तपशील खालीलप्रमाणे)**

**पेपर क्रमांक** - 1 :- **भाषा पेपर — 1 (पारंपरिक/वर्णनात्मक)**

एकूण गुण :- 100 एकूण वेळ :- 3 तास

**भाग** 1) **मराठी — 50 गुण**

प्रश्न क्रमांक 1 — निबंध — 25 गुण (दोन पैकी एका विषयावर सुमारे 400 शब्दांचा निबंध लिहिणे)

प्रश्न क्रमांक 2 — भाषांतर — 15 गुण (इंग्रजी उता-यांचे मराठीत भाषांतर करणे, सुमारे एक पान. वेगवेगळया विषयावरील दोन किंवा तीन छोटे व स्वतंत्र इंग्रजी परिच्छेद देणे)

प्रश्न क्रमांक 3 — सारांश लेखन — 10 गुण

**भाग** 2) **इंग्रजी — 50 गुण**

Question No. 1 — Essay writing — 25 Marks (Writing essay on one of two given subject about 400 words)

Question No. 2 — Translation — 15 Marks (Printed Marathi matter of one page to be translated in English, two or three separate paragraphs on different subjects for translation)

Question No. 3 — Precie writing — 10 Marks

- पेपर क्रमांक 1 हा अर्हताकारी (qualifying) स्वरुपाचा राहील. त्यातील गुण अंतिम गुणवत्ता यादीसाठी (Meritसाठी) विचारात घेतले जाणार नाहीत.
- इंग्रजी व मराठी दोन्ही भांगामध्ये **स्वतंत्रपणे** प्रत्येकी **40 पर्सेंटाईल** गुण मिळविणे आवश्यक राहील.
- पेपर क्रमांक 1 मधील, दोन्ही भागांसाठी एकच संयुक्त प्रश्नपत्रिका राहील. मात्र उत्तरपुस्तिका दोन्ही भागांसाठी स्वतंत्र रहातील. दोन्ही भागांसाठी मिळून एकूण वेळ 3 तास.

**पेपर क्रमांक**- 2 :- **भाषा पेपर -2 (वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी)**

एकुण प्रश्न :- 100 एकुण गुण :- 100 एकुण वेळ : - एक तास/दीड तास

| | | |
|---|---|---|
| **भाग** 1) | **मराठी** - | **50 प्रश्न, 50 गूण** |
| **भाग** 2) | **इंग्रजी** - | **50 प्रश्न, 50 गूण** |

- पेपर क्रमांक-2 करीता प्रश्नपुस्तिका एकच राहील.  त्यात दोन स्वतंत्र भाग राहतील.  भाग 1) मराठी भाषेचे प्रश्न क्रमांक 1 ते 50 आणि भाग 2) इंग्रजी भाषेचे प्रश्न क्रमांक 51 ते 100
- दोन्ही भागांमधील प्रश्नांचे प्रकारांमध्ये जास्तीत जास्त वैविध्य राहील.  उदा. व्याकरण, म्हणी, वाक्यप्रचार, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, शब्दांची उगम भाषा, वाक्यांवर/उता-यावर आधारित प्रश्न, शुद्धलेखन/विरामचिन्हे इ.
- भाषेची समज, आकलन, सूक्ष्म भेद, शब्दांचे नेमके अर्थ त्यांचा वाक्यांमध्ये उपयोग अशा स्वरुपाचे म्हणजेच भाषेची व त्यातील बारकाव्याची समज जाणून घेणा-या प्रश्नांवर भर देणे.
- सामान्य अध्ययनाच्या इतर 4 विषयांप्रमाणे या विषयामध्येही निगेटीव्ह मार्किंग ठेवावे. (तीन चुकीच्या उत्तरास एक गुण वजा)
- दोन्ही भागांची मिळून एकच सामाईक उत्तरपत्रिका.
- या पेपरचे गुण अंतिम गुणवत्ता यादीमध्ये विचारात घेण्यात यावेत.

**पर्याय ड)** **सध्याचे वर्णनात्मक स्वरुप कायम ठेवून त्यातील वस्तुनिष्ठ प्रश्नांचे गुण वाढविणे**

**सध्या मराठी व इंग्रजी दोन्ही पेपर्समध्ये पहिले तीन प्रश्न वर्णनात्मक/परंपरागत पद्धतीचे असून त्यासाठी एकुण** 90 **गुण आहेत व चौथा प्रश्न** 10 **गुणांचा व वस्तुनिष्ठ स्वरुपाचा** (**बहुपर्यायी नव्हे**) **आहे**. **त्यात वस्तुनिष्ठ प्रश्नाला** 10 **गुणांऐवजी** 20 **ते** 30 **गुण एवढी वाढ करणे व त्या प्रमाणात वर्णनात्मक स्वरुपाच्या पहिल्या तीन प्रश्नांचे एकूण गुण** 90 **वरुन** 70 **ते** 80 **एवढे कमी करणे**.  **थोडक्यात सध्याच्या प्रश्नपत्रिकेतील वस्तुनिष्ठ प्रश्नाचे गुण** 10 **वरुन वाढवून ते** 20 **ते** 30 **पर्यंत करणे**.

आयोगाच्या विचाराधीन असलेल्या उपरोक्त पर्यायांबाबत काही सूचना असल्यास त्या आयोगाकडे दिनांक 15 फेब्रुवारी, 2016 पर्यंत **mpscreview@gmail.com** वर पाठवाव्यात.  त्यानंतर आलेल्या सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.  सूचना पाठवितांना त्या नेमक्या व संक्षिप्त असाव्यात. त्यामध्ये विविध पर्यायांचा/प्रस्तावांचा निर्देश करतांना वर दर्शविल्याप्रमाणे पर्याय ‘अ’, ‘ब’, ‘क’, ‘ड’ या शब्दांनीच त्याचा संदर्भ द्यावा.

राजेंद्र मंगरुळकर
सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई
दिनांक 03/02/2016